सर्वे: सन्तु निरामया:

# रेकि ब्रह्म

वर्ष ८वे अंक ७वा । एप्रिल २०२०









तू नभाच्या लोचनाने
सर्व काही पाहसी...

**प्रकाशक**
**रेकि विद्या निकेतन,**
**श्री स्वामी समर्थ सेवक प्रतिष्ठान,**
ओझरे (खु.) श्री स्वामी समर्थ मार्ग
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी
महाराष्ट्र राज्य ४१५ ८०४
वेबसाईट : www.reikibrahma.org

दूरध्वनी क्रमांक: ०२३५४ २६१३२२


**संपादक:**
**कल्पिता कीर:** kalpitakeer@gmail.com
दूरध्वनी क्रमांक: +९१ ७२१८४९८७९९

**मुद्रक:** आसावरी इन्टरप्रायजेस्

वार्षिक वर्गणी: रू. १००/– (१२ अंक)
त्रैवार्षिक वर्गणी: रू. २८०/– (३६ अंक)
पंचवार्षिक वर्गणी: रू. ४५०/– (६० अंक)

**मुखपृष्ठावरचे छायाचित्र:** अमेरिकेतिल एक साधक मित्र श्री डॅन क्रिली यांना हे छायाचित्र त्यांच्या सहकाऱ्याने पाठविले; हे अमेरिकेतील आकाशात गेल्या दोन दिवसात दोन ठिकाणी दिसलेले दृश्य आहे. हे डोळे साऱ्या विश्वावर लक्ष्य ठेवून आहेत असे त्यांना वाटले व म्हणून त्यांनी आपल्या गुरुजींना पाठवून दिले.



## चैतन्याचे धुमारे

परिक्षेचे दिवस झाले आता सुरु,
हा विषय करू, का तो विषय करू?
गणित, भूगोल कठीण विषय,
शास्त्रामधला कळेना, नेमका आशय !


मराठी विषय जणू हातचा मळ,
पण इंग्रजी वाचताना येते पोटात कळ,
बौध्दिक मांडणी करू की करू सरळ पाठांतर?
प्रश्न असतील पुस्तकातलेच, का असतील इतर अवांतर?

गोंधळात गोंधळ, मग वाया जातो वेळ,
नेमस्त अभ्यासाचा काही बसेना झाला मेळ !
प्रथम आखूया अभ्यासाचे वेळापत्रक,
ठरेल जे आपणास मार्गदर्शक !

मागील प्रश्नपत्रिकांची करू उजळणी,
करता येईल ज्याने अभ्यासाची आखणी !
मित्र मैत्रिणींसोबत अभ्यासाच्या मुद्देसूद गप्पा,
परिक्षेच्या तयारीतला हा तर मुख्य टप्पा !

अवघड विषय नका टाकू लांबणीवर,
तज्ञांशी, जेष्ठांशी चर्चा करा वरचेवर !
खेळ, रेकि अन प्रार्थनेसाठी पण रोज थोडासा वेळ ठेवा,
प्रसन्न मन अन तंदुरुस्त शरीरच आहे यशस्वितेचा मेवा !!

**प्रांजल जोशी, पुणे.**



## अंकातील विशेष

| | |
|---|---|
| संपादकिय | ०१ |
| मठ जन्मला | ०२ |
| गुरुचरित्र | ०४ |
| चैतन्याचे धुमारे | ०५ |
| रेकिची बोधकथा | ०६ |
| जाहल्या स्वामीराज वैद्य | ०८ |
| तेलंगस्वामी | ०९ |
| स्वामी विवेकानंद | १० |
| आश्रम वार्ता | १२ |
| आश्रम स्पंदन | १४ |
| आगामी रेकि शिबीरे | १४ |



संपादकिय

# कोरोना व्हायरस विरूद्ध करूणा रस

कोरोना व्हायरस नावाच्या जंतूने सध्या हाहा:कार माजवला आहे सगळ्या जगात. एकेकाळी राक्षस लोक जे समाजात करायचे तेच आज ह्या आधुनिक राक्षसाने केले आहे. स्वत:ला सर्व सामर्थ्यवान आणि जगाचे सर्वेसर्वा मानणारे देश आज गुढगे टेकून ह्या जंतूविरूद्ध अक्षरश: ढसाढसा रडताना दिसत आहेत. आपल्या चेहऱ्यावर आंतरिक मुखवटे चढवून आपल्या बाह्य सुंदर चेहऱ्यांचे प्रदर्शन करून जगावर राज्य गाजवणारे नट–नटया आता आपल्या चेहऱ्यांना खऱ्याखुऱ्या मुखवटयांमागे त्याच सुंदर चेहऱ्यांना लपवत फिरत आहेत. रस्त्या–रस्त्यावर मुखवटाधारी चेहरे पाहून आपण एखाद्या इंग्रजी फिल्ममधील परकिय ग्रहांवरील 'एलियन्स' तर पाहत नाहीत ना याची आता शंका येऊ लागली आहे. सगळे जग आपल्या मुठीत ठेवण्याची संकल्पना घेऊन जगणारे चीन आणि अमेरिकेसारखे भौतिक दृष्टया समृद्ध देश आता भस्मासुराने स्वत:च्या डोक्यावर हात ठेवून स्वत:चेच भस्म होताना पहावे तसे सैरावरा धावत सुटले आहेत. स्थूलातील दुनियेशिवाय सूक्ष्माची दुनिया म्हणजे फसवणूक आहे असे ठाम मानणारे, देवाच्या आणि निसर्गाच्या कायद्यांना न जुमानणारे आधुनिक शास्त्रज्ञ आता न दिसणाऱ्या, न समजलेल्या अशा सूक्ष्मातील सूक्ष्म जंतूला घाबरून आपल्या जीवाच्या आकांताने त्याच्यासमोर गडबडा लोळताना दिसत आहेत. आधुनिक विज्ञानाची ही दयनीय अवस्था आता पाहण्याच्या पलिकडे गेलेली आहे.

हे सर्व का होत आहे? निसर्गाच्या विरूद्ध जाऊन जीवन जगण्याचा अट्टाहास का? हे आज सुज्ञ लोकांना पडलेले कोडे आहे. निसर्गाची रहस्ये एका लहान मुलाच्या कुतुहलाने उलगडण्याचा मूळ विज्ञानाचा उद्देश कधीच लयाला गेला. निसर्गाच्या साथीने केलेल्या प्रगतीने संस्कृति जोपासली आणि मानवाला देवाच्या पातळीपर्यंत पोहचवले तर निसर्गाच्या विरूद्ध जाऊन, त्याविरूद्ध दंड थोपटून आधुनिकतेच्या नावाखाली केलेला व्यापारी धिंगाणा केवळ विकृतिच्या दिशेने जाताना दिसू लागला आहे. शिक्षण आणि स्वास्थ्य ही मानवतेची दोनही अंगे आता लुळी पडल्यागत वाटू लागली आहेत हे मानवी उत्थानाचे लक्षण निश्चितच नव्हे.

जगातली सगळ्यात पुरातन अशी भारतिय संस्कृति जे करत आली ते नेहमीच मानवी जीवनाच्या हिताचेच होते हा विश्वास आपण भारतियच गमावून बसलो ही ह्या सगळ्यात शोकांतिका. दोन–तीनशे वर्षांच्या संस्कृति हजारो वर्षांच्या संस्कृतिला पोकळ आव्हाने देत आपले वर्चस्व साबित करत शड्डू ठोकत बंडखोरीचा आव आणत आहेत आणि एखाद्या नातवाचे माकड चाळे एखाद्या तपस्वी आजोबांनी शांतपणे पाहत गालातल्या गालात हसावे असेच काहीसे. कानठळ्या बसतील एवढया जोराने आज जागोजागी हात मिळवू नका त्याजागी फक्त दुरूनच नमस्कार करा असे इशारे देणाऱ्या आधुनिक घोषणांना ऐकून युगानुयुगे हे सांगत आलेली

भारतिय संस्कृति आणि सभ्यता आता मिश्किलपणे हसू लागली आहे. शाकाहार करा, मांसाहार करू नका, खाण्याच्या आधी हात पाय स्वच्छ धुवा, अंगावर केमिकल्सचे फवारे मारून सुगंध करू नका त्याऐवजी धूप, अगरबत्त्या, लोभाण याचा वापर करून घर सुगंधित ठेवा हे आजचे नारे आधुनिकतेच्या अहंकाराने वर्षानुवर्षे मानवता टिकवून ठेवलेल्या प्राचीन संस्कृतिसमोर गुढघे टेकून शरण आली आहे याचेच द्योतक आहे. भारतिय संस्कृति ही नेहमीच धोके टाळण्याच्या दिशेने काम करत आलेली आहे. काहीतरी उचापत्या करून निसर्गाच्या विरूद्ध जाऊन प्रयोग करून मार खाल्ल्यावर ची–ची करत पळत सुटण्याचा सवंगपणा भारतिय संस्कृतिने कधीच केला नाही. एक धीरगंभीर आणि उदात्त असा ओघ असलेली भारतिय संस्कृति काळाच्या ओघात वाहून गेली नाही कारण ती सत्याच्या ठाम आणि भक्कम पायावर उभी राहिली आहे. काळाचे परिमाण वापरून प्राचीन, अर्वाचीन, आधुनिक अशी शास्त्राची विभागणी करणाऱ्यांना हे कधीच कळले नाही कि सनातन, निरंतर सत्य हे काळाच्या परिमाणात मोजता येत नाही. आधुनिकतेच्या मोहमायेत फसून जाऊन किमान नव्या पिढीच्या युवकांनी आता आयुष्याचा खेळखंडोबा करू नये हा संदेश जरी ध्यानात आला तरीही ह्या कोरोना व्हायरसने आपले काम केले असे मानायला हरकत नाही. आपल्या दिव्य अस्तित्वातील हृदयात भरलेला प्रेम आणि करूणा ह्या दिव्य भावनांचा अनुभव घेणाऱ्यांना मग कोरोनाच नव्हे तर यापुढील कोठल्याच व्हायरसची भीति वाटायची गरज नाही हे निःसंशय. पिढ्या नव्या आणि जुन्या असतात शास्त्रातील सिद्धांत अबाधित असतात हेच खरे.

प्रेम, प्रकाश आणि रेकि सह,

अजित सर<br>
१० मार्च २०२०

# देवरूख आश्रमाची प्रथम भेट

**कुसुम कुलकर्णी, ठाणे.**

देवरुख आश्रमात यायची ओढ कोणाला नसते? स्वामींच्या भेटीची, सहवासाची तीव्र इच्छाच मला ८० व्या वर्षी ठाणे ते देवरुख हा प्रवास करण्यास प्रेरीत करत होती. पण प्रथमच जात असल्याने एकटीने कसे जावे ह्या विचारात मी होते. आणि अचानक रात्री ९ वाजता माईंचा (गुरुजींच्या पत्नी) फोन आला. मठाची गाडी देवरुखला परत जात आहे, तुम्ही जाणार का? रात्रीचा प्रवास एकटीने करावा का हा विचार मनात येऊन गेला. पण कदाचित स्वामींनीच माझी सोय केली आहे असे वाटून मी जाण्यास तयार झाले. रात्री १० वाजता प्रवासास सुरुवात झाली. रात्रीचा प्रवास, घाटाचा रस्ता यामुळे थोडा त्रास झाला, पण संजयने (वाहन चालक) मला सांभाळून घेतले आणि चक्क पहाटे ४ वाजता आम्ही मठात सुखरूप पोहचलो.

मठाचा सुंदर परिसर पाहून सगळा क्षीण निघून गेला. इथले प्रसन्न वातावरण, प्रेमळ सेवेकरी, स्वामींचा सहवास ह्यामुळे मन शांत झाले. गुजरातच्या साधकांनी पहिल्याच दिवशी माझे 'कुसुमबा' असे नामकरण केले. हळूहळू दैनंदिन कार्यक्रमात मी स्वतःला झोकून दिले. इथल्या लोकांनी दाखवलेली माया, आपुलकी, प्रेम ह्यात मी इतके रमले की माझ्या सगळ्या दुखण्याचा, व्याधीचा मला विसर पडला. सेवेचे १० दिवस कसे गेले कळलेच नाही.

परत निघताना मात्र पाऊलापेक्षा मन जड झाले. स्वामींचा निरोप घेताना दुःख तर झाले पण मनाला समजावले आता घरी जात आहोत ते पुन्हा परत येण्यासाठी. निघताना मी मनोमन सर्वांसाठी स्वामीचरणी प्रार्थना केली की सर्वांच्या मनात मायेचा हा जो पूर आहे तो कायमस्वरूपी असाच ओथंबून वाहत राहो.



# गुरूचरित्र – मला समजले तसे

## भक्तीकांड अध्याय ५०वा (भाग ६वा)

श्री प्रविण कुळकर्णी, ठाणे

मागच्या अध्यायात आपण गुरुगीतेचा अभ्यास केला. या अध्यायात आपण, जन्म जन्मांतरी प्राप्त केलेल्या सदगुरुंच्या कृपाशिर्वादामुळे भक्त कसा रंकाचा राव बनतो, तसेच, गतजन्माचे पुण्य वा पापाचे संस्कारच पुढच्या जन्मी चालु रहातात, व सर्वशक्तीमान सर्वज्ञ व सर्वव्यापी सदगुरु, भक्ताला आपल्याकडे खेचणयासाठी तशी क्षेत्र निर्माण करतो, त्यांच्या सहवासाने दुर्धर व्याधींचे निराकरण होते व शेवटी तोच भक्ताला ज्ञानी बनवतो याचा प्रत्यक्ष दृष्टांत पहाणार आहोत.

गुरुचरित्राच्या ९ व्या अध्यायात, श्री दत्तात्रयांच्या श्रीपाद श्रीवल्लभ या प्रथम अवतारात, श्रीगुरु एका परीटाच्या भक्तीवर प्रसन्न होऊन, त्याची वासनापूर्ती करण्यासाठी तू पुढील जन्मी राजा होशील, राजैश्वर्य भोगून श्रीगुरुंना त्यांच्या श्रीनृसिंहसरस्वती या दूसऱ्या अवतारात भेटशील व ज्ञानी होऊन मुक्ती मिळवशील असा आशिर्वाद देतात. आपल्या जीवनामध्ये महानुभावांचा सहवास कीती गरजेचा आहे हे यातून स्पष्ट होते. लौकीक ऐश्वर्य व सुखे तसेच ज्ञान व मुक्ती याच्यासाठी श्रीगुरुंची अखंड कृपादृष्टी असणे हीच काळाची केवळमात्र गरज आहे.

पुर्वजन्मीचा रजक, श्रीगुरु आशिर्वादानुसार, विदुरानगरीत म्लेंच्छ या हीनजातीच्या –पुर्व संस्कारामुळे उच्च वर्णी जन्म मिळत नसावा– राजकुळात जन्म घेतो. त्याचे अंतकरण मात्र गुरुभक्तीच्या पुर्वसंस्कारामुळे शुध्द असते, त्यामुळे, राजवैभवात लोळत असलेला राजा ब्राह्मणांचा द्वेष न करता त्यांच्यावर विशेष भक्ती करतो. म्लेंच्छ पुरोहीत त्याला दगड, काष्ठ, वृक्ष, अग्नी, पाणी गायी या सर्वांना देव मानून सगुण भक्ती करणाऱ्या ब्राह्मण जातीचा द्वेष करण्याचा सल्ला देतात. त्यांना राजा जे समर्पक उत्तर देतो ते अभ्यासनीय आहे. तो पुरोहीतांना सांगतो की तुम्ही आम्हाला शिकवलेत की प्रत्येक अणूरेणूत पुर्ण ईश्वर भरला आहे, ही समस्त सृष्टी ईश्वराची आहे. त्यानेच सर्व स्थावर जंगम, जीव निर्माण केले. सर्वांना देव एकच आहे. मतामतांमध्ये भेद आहेत. सर्व जाती व वर्णांची उत्पत्ती पंचमहाभूतातून झाली. आकाशापासून वायु, अग्नी, पाणी व पृथ्वी निर्माण झाले. या पंचमहाभूतांच्या पंच्छीकरणातून सृष्टी उत्पन्न झाली. कुंभार मातीतून वेगवेगळी भांडी बनवतो. नाना रंगाच्या गायींचे दुध पांढरेच असते. विविध सुवर्णअलंकारात सोने एकच असते. त्याचप्रकारे, अनंत नामरुपात्मक शरीरे दिसत असली तरी सर्वांच्यात एकच परमात्मा आहे. एकाच चंद्राचे प्रतिबिंब वेगवेगळ्या घटातील पाण्यात पडते. हजारो दिवे एका दिव्याने पेटवले तरी ज्योतीमध्ये प्रकाश एकच असतो. मोत्यांच्या हारात एकच सुत्र सामाईक असते, त्याचप्रमाणे, अनंत नामरुपांमध्ये एकच चैतन्यसुत्र आहे. तसेच, या पृथ्वीवर असंख्य जाती जमाती आहेत, त्यांचे उपास्य दैवत वेगळे असेल, पण सर्वांच्या अंतकरणी देवाविषयी एकच भाव आहे. तुमच्या मते, सर्वांठायी एकच परमात्मा असतांना, ते देव म्हणून दगड वा वृक्ष वा गायीला पुजतात, तुमच्या मते प्रतिमा पुजन/ सगुणमुर्ती पुजन हे संकुचित बुध्दीचे लक्षण आहे, अंतर्यामी असलेल्या आत्मचैतन्याचे पूजन हे योग्य असा शास्त्रार्थ आहे. पण ते ज्ञानीजनाना शक्य आहे. ज्यांचे अंत:करण चंचल/ अस्थिर/ कमकुवत आहे, जे निराकार निर्गुण स्वरुप परमात्मा समजु शकत नाहीत, त्यांच्यासाठी, शास्त्रसंमत सगुण उपासना आहे. ते सगुणस्वरुपात/ दगडात देवाची स्थापना करतात, व

त्याला नारायण, राम, कृष्ण अशी नावे देतात. त्या दगडात ते आपला उपास्य भाव ओततात, यात काहीच गैर नाही. आपले मत प्रस्थापित करण्याकरता आपण इतरांचा द्वेष करु नये. सर्वांना आपल्या चालीरीतीप्रमाणे वागण्याची मुभा द्यावी.

या राजाच्या मांडीवर दु:खदायी वेदना देणारा फोड होतो,(गुरु इच्छा), जो, कोणत्याही वैद्याच्या औषधानी बरा होत नाही. तेंव्हा राजा कंटाळून ब्राह्मणांचा सल्ला घेतो, ते त्याला तीर्थक्षेत्री दानधर्म वा सत्पुरुषाची भक्ती करण्यास सांगतात. तो त्यांना कोठे जावे असे विचारतो. त्याचे पश्चात्ताप दग्ध मन बघून ते त्याला पापविनाशी तीर्थावर जाऊन एकांतात स्नान करण्यास सांगतात. त्रिकालज्ञानी श्रीगुरुंना म्लेंच्छ जाती येण्याची वेळ झाली हे ज्ञात असते. गाणगापुरजनांना त्याचा उपद्रव नको म्हणून ते सर्व शिष्यांना घेऊन सिंहराशीत गुरु असल्यामुळे गोदावरी नदीवरील पापविनाशी तीर्थावर यात्रेस जातात. राजा आपला लवाजमा पापविनाशी तीर्थापासून काही अंतरावर ठेऊन एकटाच तीर्थस्नान करतो. तेंव्हा तिथे एक संन्यासी प्रगट होतो. राजा त्याला नमस्कार करून आपल्या मांडीवरील फोडाचे निराकरण करण्यास सांगतो. तो संन्यासी सांगतो की तुला सदगुरु माहात्म्याचे दर्शन झाले की तुझा फोड बरा होईल व तो त्याला पुर्वी घडलेली गोष्ट सांगतो.

उज्जैन नगरीत एक कर्मभ्रष्ट ब्राह्मण पिंगला नावाच्या वेश्येच्या घरी रात्रंदिन रहात होता व तेथेच अन्नभक्षण करत होता. त्यांच्या घरी एकदा ऋषभ नावाचा महायोगी मुनी येतो. ते दोघे त्या ऋषींचे भक्तीभावाने साष्टांग नमन करून षोडशोपचारे पूजन, नाना पक्वान्नांचे भोजन, हस्त प्रक्षालन, तांबुल सेवन, शयनासाठी चांगला पलंग, पाद मर्दन, व रात्रभर वारा घालत त्याची सेवा करतात. दुसऱ्या दिवशी तो तापसी संतुष्ट होऊन आपल्या स्थानी निघून जातो. काही काळाने वृध्दत्वाने ते दोघे मरण पावतात. पुर्व कर्मानुसार तो ब्राह्मण वज्रबाहु राजा व सुमती राणी यांच्या पोटी जन्म घेण्यासाठी गर्भ धरतो. राजाची सवत पत्नी, जेष्ठ राणीचा द्वेष करते व तीला सापाचे वीष खायला लावते. ते वीष जहर होते तरीदेखील तिला मृत्यु न येता तिच्या संपुर्ण शरीरावर वेदनादायक व्रण होतात. महाकष्टाने ती दिवस काढते. तशीच ती बाळंत होते. तिच्या मुलाच्या अंगावर (पुर्वजन्मीचा कर्मभ्रष्ट ब्राह्मण) पण व्रण होतात. कोणत्याही वैद्याच्या औषधांनी गुण येत नव्हता. माता व बालक दु:खाने बेजार होऊन ओरडत व रडत होते. रात्रंदिवस झोपेवाचून जात होते. त्यांच्या सर्वांगी कृमी झाल्या. राजा पण कंटाळला. या जीवंत शवांना रोज बघण्याऐवजी त्यांच्या कर्माचे भोग ते भोगतात असे समजून त्याने त्या दोघांना सेवकांकरवी महाघोर अरण्यात सोडले. अन्नपाण्यावाचून तडफडत ते दोघे वाघ सिंह खातील तर बरे असा विचार करत पाय फरफटत चालत होते. पुढे त्यांना एक गाव लागले, तिथे एका गुराख्याने त्यांना गावच्या महाधनी व पुण्यशील वैश्य राजाकडे जायला सांगितले. तो वैश्यराजा त्यांची गोष्ट ऐकून त्यांना रहाण्यास एक घर, अन्न, वस्त्रे देतो. त्या बालकाचा आजार नंतर वाढतच गेला व एक दिवस ते बालक आपला प्राण सोडते. ती राजपत्नी घेरी येऊन पडते व प्रचंड शोक करते. मातेला पुत्रवियोगाचे दु:ख सर्वात जास्त होते. अशा दु:खविदारक क्षणी, पुर्वजन्मीचे उपकार स्मरून तो सर्वज्ञ ऋषभ महायोगी महानुभाव तिथे दाखल होतो. रडण्याचा आवाज ऐकून इथे कोण शोकविलाप करत आहे असे तो विचारतो. तो वैश्यराजा त्याचा यथोचित आदरसत्कार करून त्याला सर्व हकीकत सांगतो. तो कृपावंत योगी त्या राजपत्नी जवळ जाऊन तिचे सांत्वन करतो. तो सांगतो की या भुमीवर कोण जन्माला येतो व मरण पावतो? आपला नाशवंत देह पाण्यावरच्या फेसाप्रमाणे वा बुडबूड्याप्रमाणे आहे. क्षणात व्यक्त तर क्षणात अव्यक्त. आकाश, वायु, तेज, आप व पृथ्वी मिळून आपले शरीर बनते व ही पाच महाभूते शरीर जाळल्यानंतर पंचत्वात विलीन होतात. दु:ख करु नकोस. रेतातून उदभवलेला जीव प्रारब्ध कर्मानुसार काळाच्या भक्षस्थानी पडतो. शुध्द सत्व मायेपासून त्रिगुणात्मक माया बनते व मलीन सत्वमायेपासून जीव उत्पन्न होतो. सत्व, रज वा तमोगुणाच्या प्राबल्यानुसार मनुष्य कर्म करण्यास प्रवृत्त होतो व प्रारब्धकर्मानुसार सुख–दु:खे भोगतो. देवांना जरी कोटी कल्प आयुष्य असले तरी ते परत मृत्युलोकात येतातच तर मनुष्याचा त्यांच्यापुढे काय पाड? कोणी लहान वयात तर कोणी वार्धक्यपणी मृत्युमुखी पडतो. या मायेपासून मोह निर्माण होतो व जीवात “मी पिता व माझा मुलगा अशी आसक्ती निर्माण करतो. तुला सांगता येते का तू मागच्या जन्मात कोणाची पत्नी वा कोणाची आई होतीस? जर तू तुझे शुभ इच्छितेस, तर शंकराला शरण जा.”

**संपादकिय भाष्य :**

तसे पाहता गुरूचरित्रातील ५०वा अध्याय ही त्यातील शेवटची कथा. ह्यानंतर श्री गुरूंच्या निजानंद गमनाची कथा व त्यानंतर गुरूचरित्राची अवतरणिका. ह्या अध्यायात आपणाला वाचायला मिळते ती कर्मसिद्धांताचे सार सांगणारे श्रीगुरूंचे कथन.. श्री श्रीपाद वल्लभांच्या अवतारात घडलेली रजकाची घटना ह्या ५०व्या अध्यायात पुन्हा आपल्या समोर सादर होते ती त्याच रजकाच्या म्लेंच्छ राजाच्या भूमिकेत जी घडली श्री गुरूंच्या अवतारकाळात. आपण केवळ एकच जन्म जगत नसतो तर पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या स्वरूपात, नव्या भूमिकेत परंतु जुन्या संस्कारांना घेऊन अवतरत असतो ह्या सिद्धांताचे वर्णन याहून सुंदर ते काय असणार? आपल्याच वासनांच्या मायाजाळात आपण कसे अडकलेले असतो हे ह्या अध्याय कथेतून वाचकाच्या ध्यानात आले तरीही ह्या अध्यायचे सार्थक झाले.

**॥श्री अवधूत चिंतन गुरुदेव दत्त॥**

# स्वामी विवेकानंद आणि ध्यान

लेखांक २रा

## मनाची चंचलता

गेल्या अंकात आपण सत्याच्या शोधापर्यंत आलो. आज त्याच्या पुढच्या भागाकडे वळू.

मनाला संयमित करणे किती कठीण असते नाही? म्हणून मनाला बऱ्याच वेळेला एखाद्या पिसाळलेल्या वानराची उपमा दिली जाते. एक वानर होता. इतर वानरांप्रमाणेच तोही असाच चुळबुळ्या होता. एवढे कमी म्हणून कि काय त्याला कोणीतरी दारू पाजली. झाले तो आणखीच पिसाळल्यागत करू लागला. तेवढयात त्याला एक विंचू येऊन चावला. माणसाला सुद्धा जेव्हा विंचू चावतो त्यावेळेला माणुस दिवसभर उडया मारत राहतो, अस्थिर होत जातो. बिचाऱ्या वानराची अवस्था तर आता अगदी बिकट झाली. काही केल्या त्याला स्वस्थ बसता येईना. तेवढया काळामध्ये त्याच्यामध्ये एका भूताने त्याच्या शरीरात संचार केला. झाले! आता त्याची अवस्था कोणत्या शब्दांत कोणी वर्णन करायची? मानवी मनही असेच त्या वानरासारखे असते. सतत उसळत असते. त्याचा स्वभाव धर्मच आहे हा. त्यात त्याला वासनांची नशा चढली कि त्याची उच्छृंखलता मग काय वर्णावी? वासनांनंतर येतो तो मत्सराचा, ईर्षेचा क्रमांक. विंचवाने मारलेल्या डंखासारखा हा मत्सराचा डंख मानवी मनाला अक्षरश: नाचायला लावतो. आणि त्यात मग भर पडते ती अहंकाराच्या भूताची. ते मानवी मनाला झपाटून टाकते आणि मग तो स्वत:च्या स्वार्थापायी आणि अहंकारापायी वेडा–पिसा होतो. मग त्याला कसे काय संयमित करायचे? कसे सांभाळायचे?

### एक मोठे आव्हान

योगशास्त्राप्रमाणे मानवी अस्तित्वात तीन प्रमुख नाडया असतात. एकीला आपण इडा म्हणतो तर दुसरीला पिंगला. आणि ह्या दोघींच्या मध्यभागी असणारी ती सुषुम्ना नाडी. ह्या सर्वच नाडया माणसाच्या शरीराच्या

मेरूदंडाच्या आत असतात. इडा आणि पिंगला ह्या तंतूंच्या जाळ्यांनी बनलेल्या असतात तर मधली सुषुम्ना ही पोकळ असते. त्यामध्ये तंतू नसतात. ही सामान्यत: सुषुप्त असते आणि सामान्य माणसामध्ये ह्या नाडीचा विशेष सहभाग नसतो. त्याच्या शरीराची सगळी कार्ये इडा आणि पिंगला ह्या दोन नाडयांनी चाललेली असतात. ह्या नाडयांच्या द्वारे संदेशवाहन चालू असते. मेंदूकडून अवयवांकडे आणि अवयवांतून मेंदूकडे.

आपल्या समोर एक मोठे आव्हान नेहमी असते. आपल्या भरकटणाऱ्या विचारांना काबूत आणणे हे ते मोठे आव्हान. आपली दुश्कर्मे जरी आपण जागृतपणे करत असतो तरीही त्या कर्मांमागच्या सगळ्या प्रेरणा ह्या जागृततेच्या पलीकडच्या मन, बुद्धी आणि अंत:करणांच्या दालनात तयार होत असतात, आपल्या अंतर्मनामध्ये. त्या आपल्या अस्तित्वाच्या अदृश्य आणि अज्ञानाच्या विभागांमध्ये हा सगळा खेळ चाललेला असतो.

आपल्या अध्यात्म्याच्या पाठशाळेमधील आपल्या अंतर्मनावर संयम हा पहिला धडा. त्यानंतर येते ते त्या जागृत मनाच्या पलिकडे जाणे. ह्याचाच अर्थ कि आपल्याला दोन गोष्टींवर एकाच वेळेला काम करावे



लागते. पहिले काम म्हणजे इडा व पिंगळा यांचे कार्य व्यवस्थित चालू ठेवणे जेणेकरून आपल्या अंतर्मनाला आपण संयमित करू शकतो. आणि दुसरे म्हणजे त्या जागृत मनाच्या पलिकडची अवस्था पार करणे.

तोच योगी म्हटला जावू शकतो जो आपल्या लांब पल्ल्याच्या साधनेने आत्मरत होऊन आपल्या अंतिम सत्याच्या दिशेने झेपावत असतो. आता सुषुम्ना उघडली जाते आणि चैतन्याचा प्रचंड प्रवाह ह्या नविन मार्गाने उसळत वरच्या दिशेने सरकू लागतो. वेगवेगळ्या चक्रांना भेदून हा चैतन्याचा खळखळणारा प्रवाह शेवटी आपल्या मेंदूत स्थिरावतो. त्या क्षणी त्या योग्याला आपले मूळ स्वरूप समजून येते. त्याला आपल्यातील दिव्य स्वरूपाचा साक्षात्कार होतो.

## ध्यानासाठीचे वातावरण

आपल्यापैकी ज्यांना शक्य आहे त्यांनी केवळ ध्यानासाठी एक वेगळा कक्ष जरूर ठेवावा. त्या कक्षामध्ये कधीही झोपू नये. त्या जागेला नेहमीच पवित्र ठेवावे. स्नान केल्याशिवाय किंवा शरिराला शुचिर्भूत केल्याशिवाय कधीही ह्या कक्षामध्ये प्रवेश करू नये. मन आणि देह दोन्हीही शुद्ध असावीत. त्या कक्षामध्ये नेहमी फुले ठेवावीत जी योग्याला प्रसन्नावस्थेत ठेवतात. मनाला आवडणारी चित्रे त्या कक्षात असावीत हेही पाहावे. सकाळ-संध्याकाळी येथे धूप लावावा जेणेकरून वातावरण सुवासिक राहील. ह्या कक्षात कधीही झगडे करणे, मोठयाने बोलणे, क्रोधाने बोलणे इत्यादि गोष्टी तेथे करू नयेत. आपल्याच समविचारांच्या माणसांनाच तेथे प्रवेश द्यावा. ह्या सर्व गोष्टींने त्या कक्षामध्ये एक पवित्र आणि सात्विक वातावरणाची निर्मिती होईल. त्यामुळे जेव्हा उदासिनता, नैराश्य, अश्रद्धा आपल्या मनाला घेरतील त्यावेळेला त्या पवित्र जागेच्या केवळ आठवणीने मनाला उभार येईल. मन शांत होईल. मंदिरे आणि चर्चेस इत्यादि धर्मस्थळांच्या मागे हीच तर मूळ कल्पना होती. परंतु आज आपण पाहीले तर असे दिसते कि ही मूळ कल्पनाच आज लुप्त झाली आहे. अस्वस्थ मनाला शांत करून वेसण घालण्याचे कार्य ह्या मंदिरांनी करायला हवे. बरे, ज्यांच्याकडे वेगळ्या कक्षाची व्यवस्था होणे कठीण आहे, त्यांनी कोठेही ध्यान करण्यास हरकत नाही.




# क्रोधापासून मुक्ती आवश्यक..

एक राज्य होते आणि इतर राज्यांसारखेच त्यालाही एक राजा होता. त्या राजाला एक पुत्र होता. विशीच्या वयातला हा राजपुत्र इतर युवकांसारखाच जरा उथळ होता. त्याला वाड्गंमयाची आवड होती. त्याला वेगवेगळी सुभाषिते फार आवडायची. एकदा राज्यात एक चांगला कवि आला होता. त्याने आपल्या साहित्याचे प्रदर्शन राजपुत्राकडे करावयाचे ठरवले. त्याच्या प्रतिभाशैलीवर राजपुत्र खूष झाला. त्याच्या एका निर्मितीतील एक वाक्य “क्रोध व्यक्त करायच्या आधी सावधानता आवश्यक आहे.” हे वाक्य त्याला खूप आवडले. त्याने खूष होऊन त्या लेखकाला एक लाख मुद्रा देऊन त्याचा गौरव केला व ते वाक्य आपण खरेदी करत असल्याचे सांगितले. एका लोहाराला बोलावून एक तांब्याची पट्टी बनवून घेतली व ती पट्टी आपल्या शयनगृहात लावून ठेवली. त्या वेळेला राजा राज्याबाहेर गेला होता.

तो परत येताच दरबारातील काही ज्येष्ठांनी राजाच्या कानावर ही घटना घातली व राजपुत्राच्या या उधळपट्टीवर मर्यादा घालावी असे राजाला सुचविले. राजालाही ही गोष्ट पटली नाही कि एका वाक्याला राजपुत्राने एवढा खर्च का करावा? त्याने ज्येष्ठांच्या शब्दांना मान देवून राजपुत्राला दरबारात पाचारण केल व ह्या खर्चाबद्दल जाब विचारला. एवढे पैसे मिळवण्यासाठी केवढे श्रम करावे लागतात याची त्याला जाण नाही हेही निक्षून सांगितले व सजा दिली कि राजपुत्राने आपल्या राज्याबाहेर जाऊन स्वतःच्या मेहनतीने एवढे पैसे कमवावेत व राज्याच्या खजिन्यात भरावेत. जोपर्यंत हे तो करू शकत नाही तोपर्यंत त्याने राज्यात परत येऊ नये. राजपुत्राने आपल्या पित्याची आज्ञा पाळून आपल्या गर्भवती पत्नीला राज्यात सोडूनच राज्याचा त्याग केला.

अशी बरीच वर्षे लोटली. साधारण वीस वर्षे उलटल्यानंतर राजपुत्राकडे एक लाख मुद्रा भरण्याएवढे पैसे जमले व तो राज्यात परत आला. त्याने ते पैसे राज्याच्या खजिनदाराकडे भरले व लगबगीने तो आपल्या महालात आला. तोपर्यंत बऱ्यापैकी रात्र झाली होती. जसे त्याने आपल्या शयन कक्षात पाऊल ठेवले, त्याला लक्षात आले कि आपली पत्नी निद्राधीन आहे. तिला जाग येऊ नये म्हणून दबक्या पावलांनी त्याने शयनगृहात प्रवेश केला. आणि अचानक त्याच्या लक्षात आले कि मंचकावर आपल्या पत्निसोबत एक कोणी तरणाबांड, देखणा युवक निजला आहे. अचानक त्याच्या डोक्यात क्रोधाची कळ उमटली आणि आपल्या कमरेला लावलेली त्या युवकाला मारण्याच्या इराद्याने त्याने उपसली व अतिशय त्वेषाने सर्व शक्तिनिशी त्याने ती मागे नेली. त्याच वेळेला ती तलवार मागे भिंतीवर असलेल्या एका ताम्रपट्टीवर आपटून मोठा नाद झाला. त्या आवाजासरशी गाढ झोपेत असलेली त्याची पत्नी व तो युवक दोघेही दचकून जागे झाले व मंचकावर बसले. पत्नीने आपल्या नवऱ्याला ओळखले व खूप आंनदित झाली. ती म्हणाली, “अहो, हा एवढा क्रोध कशाला?” त्याच्या कटाक्षावरून तिच्या लक्षात आले कि राजपुत्राला आपल्या मंचकावर झोपलेल्या युवकाचा संशय आलेला आहे. तिने हसून सांगितले, “अहो, हा तर आपला पुत्र आहे. वीस वर्षांपुर्वी तुम्ही राज्य सोडून गेलात ना त्यानंतर दोनच महिन्याने याचा जन्म झाला. आता हा आपला पुत्र २० वर्षांचा झाला आहे.” हे ऐकून तो राजपुत्र खूष झाला आणि आपल्या हातातील तलवार खाली ठेवून त्याने आपल्या पुत्राला प्रेमाने आलिंगन दिले. वळून त्याने त्या पट्टीकडे पाहीले व कृतज्ञतेने हात जोडून नमस्कार केला. त्याच्या लक्षात आले कि ज्या वाक्यासाठी त्याने एक लाख मुद्रा दिल्या होत्या; त्याने त्याच्या हातून होणारी स्वतःच्या पुत्राची हत्या थांबवली होती. त्या वाक्याचे मूल्य त्याने दिलेल्या मूल्याच्यापेक्षा हजारो पटीने जास्त होते.

**तात्पर्य:** प्रतिक्रिया देण्याआधी सर्व गोष्टींचा सारासार विचार करावा नाहीतर न भरून येणारे नुकसान होते.



# जाहल्या स्वामीराज वैद्य, व्याधी पळे आपणची...

(लेखांक ७)

केशव नाईक करंडे यांना श्रींची मोठीच कृपा प्राप्त झाली. श्री स्वामी रायांकडून पादुका व अन्य वस्तु मिळाल्या, त्या केशव नाईकांच्याच कारकिर्दीत. त्या मागची पार्श्वभूमी ही विलक्षण आहे. केशव नाईक यांना दिनांक २५ जुन १८७२ला पुत्ररत्न प्राप्त झाले. त्याचे नाव रामचंद्र असे ठेवण्यात आले. रामचंद्र हे दीड वर्षांचे असताना त्यांच्या डाव्या पायास जखम झाली. ती जखम इतकी चिघळली कि ती बरीच होईना. त्या काळात ऍलोपॅथी औषधांची उपलब्धता जवळ जवळ नव्हतीच. तरीहि परदेशी साहेबांमध्ये डॉक्टर होते. युद्ध प्रसंगानंतर इंग्लंडहून मोठमोठे शल्य विशारद मुंबईत आले होते. भारतातही अनेक डॉक्टर तयार होत होते. केशव नाईक यांनी पुत्र रामचंद्रला जे. जे. हॉस्पिटलमध्ये नेले. नाईक कुटुंबाच्या ओळखीही मोठया होत्या. त्यांनी हॉस्पिटलच्या डीनला गाठले. डीन कर्नल टॉडहंटर हे निष्णात डॉक्टर व सर्जन होते. त्यांनी मुलाची काळजीपूर्वक तपासणी करून सांगितले कि सेप्टीक वाढण्याचा संभव आहे. ताबडतोब ऑपरेशन करणे हाच उपाय आहे. इतर उपायांच्या मागे जाण्याने उपयोग होणार नाही. तर मी एक काम करतो, तीन तज्ज्ञ सर्जन व तीन तज्ज्ञ फिजिशियन अश्या सहा जणांची समिती नेमतो आणि त्यांच्याकडून मुलाला तपासून घेतो. टॉडहंटरने नुसतेच सांगितले नाही तर त्वरित सहा डॉक्टरांना बोलावून कमिटी नेमली. त्या सर्वांनी तपासले व ताबडतोब निर्णय दिला कि त्वरित ऑपरेशन करावे. वेळ वाया घालवू नका. नाहीतर सेप्टीक वाढेल, अंगात भिनेल मग मुलगा काही वाचत नाही, पाय काढावाच लागेल. पाय जाईल पण जीवाची शाश्वती तरी देता येईल. कर्नल साहेबांनी पाय ऑपरेट करण्यासाठी ऑपरेशनची तारीख दिली. त्या तारखेच्या आधी एक दिवस मुलाला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. केशवजी सुन्न मनाने घरी परतले. स्वामी महाराजांना प्रार्थना करीत त्यांनी मन घट्ट केले. अवघ्या दीड वर्षाच्या मुलाचा पाय कापल्यावर त्याने आयुष्य लंगडेपणाने कसे घालवावे? तो कसा हिंडणार, फिरणार? तत्पूर्वी त्यांनी ठरविले कि त्याला श्री स्वामी महाराजांच्या पायावर ठेवावे. मुंबईहून सोलापूरपर्यंत ते रेल्वेने गेले. सोलापूरवरून अक्कलकोटला. गावात चौकशी करता महाराज भक्तगणांसमवेत वडाखाली बसले असल्याचे समजले. केशवरावांनी श्री स्वामीदेवांकडे धाव घेतली. श्रींना पाहताच त्यांचे डोळे डबडबले. मुलाला घेऊन ते श्री चरणांजवळ गेले. साष्टांग नमस्कार घातला. नंतर मुलाला पुढे करताच त्या सृष्टीनिर्मात्याने बाळाला मांडीवर घेतले.


केशवजींनी श्रींना मुलाच्या पायाची जखम दाखवली. शस्त्रक्रियेसंबंधीही सांगितले. हे सांगताना केशवजी भावनावश होऊन गेले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रुंचा ओघ वाह्यला लागला. श्री स्वामीरायांनी मुलाचा जखमांनी भरलेला पाय

बघितला.. हलकेच मान वर उचलली. व्यथित पित्याचे अश्रू ओघळताना पाहिले नि क्षणात त्या दयाघनाने कृपेचा वर्षाव सुरू केला. ते म्हणाले, “शस्त्रक्रियेचे मग पहा. सध्या जवळच्या हत्तीखान्यात एक हत्ती मुतत आहे. त्या मुताने भिजलेली माती गोळा करा. आणि ती माती मुलाच्या पायाच्या जखमेवर थापा. असे दहा दिवस करा. मग पाहू.”

श्री स्वामी समर्थांची आज्ञा झाल्यावर मग काय! केशवजींनी लगेच हत्तीखान्यातून जाऊन तेथील हत्तीच्या लघवीने भिजलेली माती घेऊन त्याचा लेप मुलाच्या पायास थापला. दिवसेंदिवस जखम बरी होत चालली. दहा दिवसात जखम भरली. मुलाचे बरे होणे त्यावेळच्या वैद्यक शास्त्रासाठीच एक आव्हान ठरणार होते. ऑपरेशनच्या तारखेच्या एक दिवस आधीच केशवजी मुलाला घेऊन डॉ टॉडहंटरकडे गेले. त्यांनी मुलाला तपासले व ते आश्चर्यचकित झाले. ते म्हणाले, “तुमच्या मुलाची जखम पूर्ण भरून आली आहे. आता ऑपरेशनचा विचारच नको. अभिनंदन! पण मला सांगा, मुलाचा पाय बरा करण्यासाठी तुम्ही कोणते उपाय केले? कोणते औषध लावले ते आम्हालाही सांगा. म्हणजे इतर रूग्णांसाठी त्याचा आम्हाला उपयोग होईल.”

नंतर केशवरावांनी अक्कलकोटमध्ये घडलेल्या घटनेचे इतंभूत वर्णन डॉक्टरांसमोर केले. डॉ. टॉड यांनी हे सगळे ऐकून घेतले. त्यांनी ती बाब चेष्टेवारी नेली नाही. त्यांना श्री स्वामी समर्थ कोण हे मुळीच माहीत नव्हते. तरी त्यांनी त्या घटनेची गंभीरता लक्षात घेतली. मुलाचा पाय तोडण्याइतपत खराब झाला असताना पंधरा दिवसात जखमेचा मागमूस दिसत नाही हे कसे घडले? डॉक्टरांना उत्सुकता होती. त्यांनी लगेच “अनालायझर” मंडळींना तयार करून अक्कलकोटास पाठवले व हत्तीखान्यातील हत्तीच्या लघवीची माती आणून तपासली. त्याचे पृथःकरण केले. त्या तपासणीत त्यांना कोणत्याच औषधाचा मागमूस आढळला नाही. महाराजांना हे वृत्त कळविण्यात आले. तेव्हा महाराज जे बोलले ते वाचल्यावर कोणीही अचंबित झाल्यावाचून राहणार नाही. महाराज टॉडना उद्देशून म्हणाले, “कर्नल साहेबांना हे कळवा आणि म्हणा, टॉडसाहेब, तुम्ही गॉडला विसरलात. गॉडने औषध लावले. मुलगा बरा झाला.”


(संदर्भ अक्कलकोट निवासी श्री स्वामी महाराज यांच्या पुरातन मठांतील चरणपादुका–लेखक श्री संजय वेंगुर्लेकर पृष्ठ ३२५)



(भाग २८वा)

# तेलंग स्वामी

## एक अद्भुत अस्तित्व



अनुवादक – सौ. शुभदा गर्गे, नाशिक

अंबालिका नावाची एक बाई रोज स्नानाला पंचगंगा घाटावर जायची. स्नान झाले की फुले घेऊन ती स्वामीजींजवळ जायची व त्यांना साक्षात विश्वनाथ समजुन त्यांची पुजा करायची. कधी अंबालिकेबरोबर तिची एकुलती एक मुलगी शंकरी पण असे. आईची भक्ति पाहून तिची पण स्वामीजींवर अपार श्रध्दा जडली.

त्याच काळात काशीत देवीची साथ आली. शंकरीला त्याची लागण झाली व तिची प्रकृती खालावू लागली. मुलीची हि स्थिती पाहून आई हवालदिल झाली. खाणे–पिणे, स्नानादी कार्ये सोडून शंकरीची सेवा करू लागली.

एक दिवस शंकरी निपचित झाली. आवाज दिल्यावर डोळेही उघडेना. अंबालिका समजून चुकली की आता शंकरी काही बरी होत नाही. दुःखावेग अनावर होऊन ती जोरात रडू लागली. तेव्हाच चमत्कार झाला व शंकरीचा आवाज आला, “आई, तू का रडते आहेस?” मुलीचा आवाज ऐकून आई अचंबित झाली. जी निपचित पडली होती तीच आपली मुलगी चक्क बोलते आहे. डोळे पुसत आई म्हणाली, “आता माझी सहनशक्ती संपली. तू बोलतही नव्हतीस. जणू परमेश्वर माझ्यावर रुसला आहे. स्वामीजी पण कृपा करीत नाहीत.”

शंकरी म्हणाली, “आई असे म्हणू नकोस. स्वामीजींची आपल्यावर पूर्ण कृपा आहे. ते तर तुझ्या शेजारीच उभे आहेत.”

अंबालिकेने सर्वत्र नजर फिरविली. तिला कोणीही दिसले नाही. शंकरीला शेवटचा भ्रम झाला आहे असे वाटल्याने ती दुःखाने ओरडली, “कुठे आहेत स्वामीजी? मला कसे दिसत नाहीत?”

आईचे बोलणे ऐकून शंकरीला आश्चर्य वाटले. तिने आईचा हात धरून स्वामीजींच्या पायावर ठेवला. त्याक्षणी अंबलिकेला स्वामीजींचे दर्शन झाले.

शंकरीच्या उशाशी बसत स्वामीजी म्हणाले, “तू तर राणी आहेस. तुझी आई उगीच घाबरते. तू लवकरच बरी होशील.” दुसऱ्या दिवसापासून शंकरीची प्रकृती सुधारू लागली व पाचव्या दिवशी ती पूर्ववत झाली.

शंकरी घरात असलेल्या रामाच्या लाकडी मूर्तीशी खेळत असे व त्या मूर्तीची पुजाही करीत असे. एक दिवस तिला वाटले, लाकडी मूर्तीची काय पुजा करायची. स्वामीजींच्या कृपेने आपला आजार बरा झाला आहे तर त्यांचीच पुजा करूया. आई गंगेवर स्नानाला गेली होती. शंकरी हार व पुजेचे साहित्य घेऊन बाहेर जाण्यास तयार झाली. तेव्हा तिने पाहिले की रामाची मूर्ती गायब झाली व तिथे स्वामीजींची मूर्ती होती. तिला समजेचना काय झाले ते. एवढयात मूर्तीतून आवाज आला की बेटा पूजा करतेस ना! शंकरी पूजा करू लागली. तिची समाधी लागली. समाधीतून बाहेर आल्यावर बघते तर काय समोर तीच्या रामाची मूर्ती! शंकरीला वाटले ती स्वप्नात आहे. ती तडक स्वामीजींच्या आश्रमात गेली. स्वामीजी ध्यानस्थ होते व शंकरीने घरी जो फुलांचा हार त्यांच्या गळ्यात घातला होता तो आत्ताही त्यांच्या गळ्यातच होता. स्वामीजींनी डोळे उघडताच शंकरीने हाराबद्दल विचारले तर स्वामीजींनी सांगितले की तिनेच तर हार त्यांच्या गळ्यात घातला होता. शंकरी चकीत झाली. तिच्या बालमनाला काहीच आकलन होत नव्हते.

एक दिवस स्वामीजी गंगा स्नानाला जात असताना त्यांना रस्त्यात शंकरी भेटली. ते तिला आपल्याबरोबर गंगेवर घेऊन गेले. स्वामीजींनी एक डुबकी मारली व मग शंकरीला बोलावले. शंकरीने पोहता येत नाही असे सांगितले. स्वामीजींच्या सांगण्यानुसार शंकरी त्यांच्या पाठीवर बसली. थोडे अंतर पोहत जाऊन स्वामीजींनी डुबकी मारली. शंकरी चकीत झाली कारण ती

पाण्याखाली एका महालवजा घरात उभी होती. स्वामीजींनी विचारले, "बेटा तू कुठे आहेस?" शंकरी म्हणाली, "बाबा हा तर महाल वाटतो आहे." स्वामीजींनी विचारले, "तू महाल कुठे पाहिलास?"

शंकरी म्हणाली, "दशाश्वमेध घाटाच्या बरेच पुढे एकदा आईबरोबर गेले होते."

एवढयात शंकरीला समोर तिच्या एवढीच एक मुलगी दिसली. ती कोण असल्याचे विचारताच स्वामीजी म्हणाले, "ह्या देवी भगवती आहेत. त्यांना नमस्कार कर."

शंकरीने नमस्कार केल्यावर विचारले की आपण तर गंगेच्या पाण्यात होतो न, मग पाणी कुठे गेले? स्वामीजींनी तिला चारी बाजुला हात लावायला सांगितले. शंकरीने हात लावताच तिला सर्वत्र पाण्याचा स्पर्श झाला व ती मोहरून गेली.

थोडया वेळाने शंकरीला जाणवले की ती घाटावत बसली आहे, समोर गंगा वाहते आहे, लोकं स्नान करीत आहेत व स्वामीजी पण पाण्यात डुबक्या मारीत आहेत.

तिने स्वामीजींना विचारले, "बाबा आपण कुठे गेलो होतो व परत इथे कसे आलो?"

स्वामीजी म्हणाले, "आपण निष्काम धामाला गेलो होतो. तू निरागस असल्याने तिथे येऊ शकलीस."

घरी गेल्यावर शंकरीने आईला सर्व वर्णन करून सांगितले. अंबालिका विश्वास न बसल्याने अवाक होऊन बघत राहीली.

# आश्रम वार्ता:


## १. विश्व अग्निहोत्र दिवस:


१२ मार्च हा विश्व अग्निहोत्र दिवस म्हणून साऱ्या विश्वभरात पाळला जातो. याच दिवशी १९४२ साली प्रत्यक्ष भगवान परशुरामांनी अक्कलकोटच्या श्री गजानन महाराजांना गुरूमंदिरात देहरूपात दर्शन देऊन कृतकृत्य केले व अग्निहोत्र आजच्या रूपात साऱ्या विश्वभर पसरवण्याची आज्ञा दिली, जी आज सप्तश्लोकी या नावाने प्रसिद्ध आहे. आपल्या देवरूखच्या मठामध्ये हा दिवस मोठया उत्साहाने साजरा होतो व ह्या घटनेला जेवढी वर्षे झाली तेवढया अग्निहोत्रांचे प्रज्वलन केले जाते. या वर्षीही संध्याकाळच्या अग्निहोत्राला ७८ अग्निहोत्र कुंडांमध्ये आहुति दिली गेली. साऱ्या जगताला घाबरवणाऱ्या "कोरोनाव्हायरस"च्या राक्षसापासून जगाची मुक्ती व्हावी हा या सामूहिक अग्निहोत्राचा संकल्प होता.



## २. साधक अवधूत पोटफोडेंच्या कलेला परदेशात मागणी:

देवरूखातील कलाकारांच्या कलेला जगाच्या समोर आणण्यासाठी आपल्या मठाने आणि गुरूजींनी प्रयत्न केले आहेत हे सर्वज्ञात आहे. ह्या प्रयासांना आता परदेशात प्रतिसाद मिळू लागला आहे याचे उत्तम उदाहरण म्हणजे देवरूखातील आपले एक ज्येष्ठ साधक व एक मान्यवंत कलाकार श्री अवधूत पोटफोडे यांच्या चित्रांना आता अमेरिकेतील काही घरांतून आणि हॉटेलांमधून स्थान मिळाले आहे. ही तर नुसती सुरूवात आहे. आपल्या कलेद्वारा देवरूखचा ठसा आता जगभर पसरेल हे नि:संशय. जी चित्रे आता अमेरिकेत गेली आहेत त्यांच्या प्रतिमा खाली दिल्या आहेत.





## ३. श्री स्वामी समर्थ मठाचा २०वा वर्धापन दिन:

श्री स्वामी समर्थ मठ १५ मार्च २०२० रोजी २० वर्षांचा झाला. त्या निमित्त दिनांक १४ व १५ मार्च २०२० ह्या दिवशी कार्यक्रम करण्यात आले. फुलांनी आणि इतर कलाकृतींनी सजलेल्या मठामध्ये आकर्षून घेत होते ते मठाच्या २० वर्षांच्या काळातील आठवणी जागवणारे छायाचित्र प्रदर्शन. मठाशी संबंधीत अश्या जुन्या साधकांना तर ह्या प्रदर्शनाने भावनांचा उचंबळ आणवला. १४च्या संध्याकाळी "झाली स्वामीकृपा झाली" हा श्री जितेंद्र मिस्त्रींचा गायन कार्यक्रम तर ह्या उत्सवाचा मेरूमणि. आपल्या भावपूर्ण गायनाने त्यांच्या चमूने तर एक आगळीच मजा आणली. १५तारखेचा "उदकशांति"चा कार्यक्रम नेहमीप्रमाणेच एक आगळी वेगळी चेतना तयार करून गेला. सगळे वातावरण अश्या उपासनेने कसे प्रसन्न होते हे सर्वांनाच जाणवले.१५च्याच सायंकाळी कोल्हापूरातील हुपरी गावातील आपल्या युवा साधकांचा गायनाचा कार्यक्रम तर एका नव्या युगाची सुरूवातच म्हणावी. समिक्षा आणि आकांशा ह्या जोशी भगिनी तर लवकरच भारतातील प्रथितयश गायिका होतील हे नि:संशय. त्यांच्या बरोबरच्या चिमुकल्या आर्या कुळकर्णीने तर आपल्या छोटया वयातच पाळण्यातील पाय दाखवले.

१५च्या रात्रीच्या आपल्याच साधकांनी बसवलेलेल्या नाटिकेने "कोरोनाव्हायरस"च्या पार्श्वभूमीवर भारतीय संस्कृतिमध्ये कवचाचे (मूळत: दत्त कवचाचे) महत्व प्रेक्षकांच्या मनात प्रस्थापित केले ह्यात संशय नाही. केवळ दीड दिवसात बसवलेल्या ह्या नाटिकेने आपल्या साधकांच्या कलाविष्काराचे नविन पैलू पुन्हा नजरेत आले. कार्यक्रमाच्या शेवटी गुरूजींनी कु. कल्पिता कीर ह्या साधिकेचे "एक आदर्श साधक" असा गौरव पुरस्कार जाहीर केला. हा पुरस्कार आता गुरू पौर्णिमेच्या दिवशी प्रदान केले जाईल. गुरूजींनी मठाच्या ह्या २०व्या वर्धापनदिनी २० कलमी सामाजिकप्रकल्पमठाच्या व्यवस्थापनातर्फे सादर केले.





In congestion, blocked nose and cough due to cold

# Kidyrub™

Eucalyptus Oil I.P. 1.5% w/w + Menthol I.P. 1% w/w + Camphor I.P. 6% w/w

Ointment

## Soothing Rub for Kids

- Clears congestion
- Helps breathing
- Eases cold
- No burning sensation



Safe For 3 Months & Above




Yash Pharma Laboratories Pvt. Ltd.
www.yashpharma.com

# व्हायरससचा सामना कसा करावा?

पहिली गोष्ट म्हणजे आपण निसर्ग नियमांचा आदर करावा. जसा आपण एखाद्या देशात किंवा प्रांतात राह्यला गेलो कि तेथील नियम पाळतो कारण तसे न केल्यास तो दंडनीय अपराध असतो. आपण सदैव लक्षात ठेवायचे कि आपण ह्या जगात एक पाहुणे म्हणून राह्यला आलेलो आहोत. निसर्गाच्या ह्या घरात काही दिवस राह्याचे, त्याचा छानसा पाहुणचार घ्यायचा आणि एका दिवस निरोप घेऊन पुन्हा आपल्या स्वस्थानी जायचे हेच आयुष्य आहे. निसर्ग नियमानुसार आपण सकाळी लवकर उठायचे, ऋतुमानानुसार खायचे, प्यायचे, शुचिर्भूत राह्यचे, मन प्रसन्न ठेवायचे, कोणालाही त्रास द्यायचा नाही, मिळून मिसळून, हसत खेळत राह्यचे, कोणाला रडवायचे नाही आणि स्वत:ही रडत राह्यचे नाही. हे झाले कि आयुष्य सफल झाले. ह्या सगळ्यामध्ये आपली रोग प्रतिकारक शक्ती मजबूत केली कि आपण कोठल्याही रोगजंतूंना टक्कर द्यायला मोकळे. खरे पाहता कोठलाही जंतू (ज्याला आज काल व्हायरस असे नाव आहे) माणसाला मारायला जन्म घेत नसतो. माणुस म्हणजे केवळ एक कोट्यावधी अशा जंतूंची वसाहत आहे आणि हे जंतू जेव्हा आपापसात झगडतात तेव्हा माणसाला रोग जडतात जसे एखाद्या शहरात दंगा–धोपा करणारे आपल्याच शहराला नष्ट करत असतात काहीसे तसेच. परंतु ज्यावेळेला त्या शहरात कायदा आणि सुव्यवस्था जर सुरळीत असेल तर दंगे–धोपे होत नाहीत तसेच शरीरात प्रतिकारक शक्ती मजबूत असेल तर ह्या जंतूंना आपापसात झगडता येत नाही. दररोज रेकि घ्यायची, साधना करायची आणि ती आचरणात आणून दिव्यत्वाचा अनुभव करायचा मग कोणत्याही रोगाला आपल्या वाटेला जायची हिंमत होत नाही.

## आगामी उपक्रम: रेकि शिबिरे

| दिनांक | रेकि शिक्षक | केंद्र/स्थान | श्रेणी | नोंदणीसाठी संपर्क |
|---|---|---|---|---|
| ४ व ५ एप्रिल | अजित सर/ राकेश | बडोदा | २री | चंद्रेशभाई परमार (९९७४७०१२००) |
| ४ व ५ एप्रिल | कृपा चोक्सी | कोटा | १ली | डॉ. निता पारेख (९४१३८८६७५५) |
| ११ व १२ एप्रिल | अजित सर/कल्पिता कीर | चिपळूण | २री | जयंती काटदरे (९४०५८४९३६४) |
| ११ व १२ एप्रिल | विशाल श्रीधनकर | दिल्ली | १ली | प्रीति खन्ना (८३६८३३७२४०) |
| ११ व १२ एप्रिल | संगिता कुळकर्णी | ऐरोली | १ली | आदिती पुसेगांवकर (९५९४९५९०१९) |
| ११ व १२ एप्रिल | भारतिबेन | अहमदाबाद | १ली | किनल पंड्या (९७१४५१५८३९) |
| ११ व १२ एप्रिल | सीमाबेन त्रिवेदी | भावनगर | १ली | चंद्रेशभाई परमार (९९७४७०१२००) |
| १८ व १९ एप्रिल | राकेश कुमार | ठाणे | १ली | गिरीश कर्णिक (९८२०२६०२२९) |
| १८ व १९ एप्रिल | कल्पिता कीर | कुडाळ | १ली | प्रकाश भोगटे (८९५६५०२०३९) |
| १८ व १९ एप्रिल | सीमाबेन त्रिवेदी | मुंबई | १ली | विनया सावंत (९००४३२८०१६) |
| १८ व १९ एप्रिल | विशाल श्रीधनकर | पुणे | १ली | अमृत किरपेकर (९१७५०५०९००) |
| २५ व २६ एप्रिल | कल्पिता कीर | गोवा | १ली | नेत्रा गावस (९४२२६४३१०६) |
| २५ व २६ एप्रिल | संगिता कुळकर्णी | नाशिक | १ली | मोनाली राक्षे (९४२०६९२१३६) |
| २५ व २६ एप्रिल | कृपा चोक्सी | राजकोट | १ली | ज्योति सरैय्या (९८२४२९९१५३) |

**श्रीकर बलजेकर**
८/७०१ गार्डन इन्क्लेव, धरमवीर मार्ग, सिध्दाचल जवळ,
वसंत विहार, ठाणे (प) ४००६१०, दूरध्वनी: ९८१९६ ९०४४१

आपला पत्ता जर बदलला असेल तर
कृपया श्रीकर बलजेकर यांना संपर्क साधावा.

बुक–पोस्ट

रेकी ब्रम्ह मासिका संदर्भातल्या आपल्या प्रतिक्रिया किंवा आपले लेख, अनुभव अथवा प्रश्न आपण आम्हाला खालील संपर्कावर पाठवू शकता.

कल्पिता कीर: kalpitakeer@gmail.com
दूरध्वनी क्रमांक: +९१ ७२१८४९८७९९